
BOX

**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०४, मुंबई**
**भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई**

**-: प्रेस नोट :-** **दिनांक १९/०९/२०२५**

**<u>४ कोटी ७ लाख ३८ हजार किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी करणा-या तीन आरोपीतास मुद्देमालासह अटक</u>**

दि. ०८/०९/२०२५ रोजी दुपारी १४.०० वा. ते दि. ०९/०९/२०२५ रोजी १०.३० वा. चे दरम्यान ए जलिचंद ज्वेलर्स शॉप, वर्धमान कृपा बिल्डींग, डॉ. बी. ए. रोड, परेल, मुंबई येथुन त्या ठिकाणी काम करणारा कामगार नामे जितु नवाराम चौधरी, वय २३ वर्षे हा शॉपमधील ४,०७,३८,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी करुन निघुन गेला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन भोईवाडा पोलीस ठाणे गुरक्र. ३४६/२५ कलम ३०६ भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य पाहता वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली भोईवाडा पोलीस ठाणेचे एक पथक तात्काळ पाहिजे आरोपीचे राहते गावी सादडा, ता. बाली, जि. पाली, राज्य-राजस्थान येथे तपासकामी पाठविण्यात आले होते. तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष ४, मुंबई चे पथक देखील सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत होते. पोलीस पथकाने तांत्रिक तपासाचे आधारे तसेच गुप्त बातमीदारांच्या मदतीने यातील पाहिजे आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक केले तसेच त्याचे इतर दोन साथीदारांना अटक करुन त्यांचेकडुन अद्यापपर्यंत गुन्हयातील ७० टक्के मालमत्ता हस्तगत करण्यात आली असुन उर्वरीत मालमत्ता हस्तगत करीत आहेत.

**<u>अटक आरोपीचे नाव व पत्ता</u> -**

१) जितु नवाराम चौधरी, वय २३ वर्षे, रा.ठी. गाव सादडा, तालुका-बाली, जिल्हा-पाली, राज्य-राजस्थान
२) कमलेश वाघाराम चौधरी, वय २६ वर्षे, रा.ठी. न्यु आबादी, भंडारवाजव, कुडाळा, ता. बाली, जि. पाली, राजस्थान
३) भरतकुमार ओटाराम चौधरी, वय ३८ वर्षे, रा.ठी. जुनी मोहिला वास, कुडाळा, ता. बाली, जि. पाली, राजस्थान

सदरची कामगीरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई शहर, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.), श्री. सत्य नारायण चौधरी, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, श्री. विक्रम देशमाने, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४, श्रीमती रागसुधा आर., मा. पोलीस उप आयुक्त, प्रकटीकरण, श्री. राज तिलक रोशन, मा. सहायक पोलीस आयुक्त, भोईवाडा विभाग, श्री. घन:शाम पलंगे, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भोईवाडा पोलीस ठाणे, श्री. दत्तात्रय ठाकुर, यांचे मार्गदर्शनाखाली भोईवाडा पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. नितीन महाडीक, पोलीस उप निरीक्षक श्री. सचिन बोरसे, पोलीस उप निरीक्षक श्री. अमित कदम, पोलीस उप निरीक्षक श्री. ओंकार आडके, पो.ह. संतोष खेडेकर, पो.शि. अविनाश सुतार, पो.शि. प्रदिप राठोड, पो.शि. शंकर जोशी तसेच गुन्हे शाखा, कक्ष-४, मुंबई चे सहायक पोलीस निरीक्षक श्री. अजय बिराजदार, पो.ह. महाजन, पोशि. जावीर, पोशि. चव्हाण यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

•••